# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामीण कृषि मौसम सेवा,ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.०१/०४/२०२५

### जिल्हा : सोलापूर

**हवामान अंदाज :**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०१/०४/२०२५ ते ०५/०४/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| पाऊस (ममी) | 1 | 1 | 3 | 2 | 1 |
| कमाल तापमान (अं.से.) | 39 | 39 | 37 | 37 | 37 |
| कमान तापमान (अं.से.) | 26 | 25 | 24 | 24 | 25 |
| ढग स्थिती (आकाश) | 4 | 3 | 4 | 4 | 2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 58 | 57 | 58 | 57 | 58 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 42 | 42 | 43 | 42 | 42 |
| वाऱ्याचा वेग (कमी/तास) | 3 | 8 | 10 | 2 | 3 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 103 | 100 | 78 | 72 | 264 |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृ ष वषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०१ ते ०५ ए प्रल, २०२५ दरम्यान तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादे शक हवामान केंद्र , मुंबई यांच्या अंदाजानुसार जिल्ह्यात दिनांक ०४ ए प्रल, २०२५ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० क.मी./तास), मेघगर्जना, वजांसह पावसाची शक्यता आहे. |
| वस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस) | | वस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) मध्य महाराष्ट्र वभागात (धुळे, नंदुरबार, जळगाव, ना शक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर) दिनांक ०६ ते १२ ए प्रल, २०२५ दरम्यान<br>➢ पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमाल तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे.<br>➢ कमान तापमान सरासरी इतके राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | • काही ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी, तसेच उघड्यावरील धान्य ताडपत्रीने झाकून ठेवावे.<br>• फळबागेमध्ये ज मनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनांचा वापर करावा.<br>• शेतकरी बांधवांनी आपल्या पकाचे कीड व रोगासंदर्भात निय मत सर्वेक्षण करून , जर प्रादुर्भाव आ र्थक नुकसान पातळीच्या वर असल्यास, व वध योग्य त्या उपाययोजना कराव्यात.<br>• शेतकरी बंधूनी , हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामा नाचा पूर्वानुमाना करीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>• शेतकरी बंधूनी, मेघगर्जना व वजेच्या पूर्वानुमानाकरिता दा मनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |

| | | |
|---|---|---|
| | | • शेतकरी बंधूनी, कृ ष वषयक माहितीसाठी, महात्मा फुले कृ ष वद्यापीठाच्या कृ षदर्शनीचा एक संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करावा. |
| **अवकाळी पाऊसा पूर्वी व नंतरच्या उपाययोजना** | | मेघगर्जना, वजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा आ ण अवेळी पाऊसाची शक्यता असल्याने फळ झाडांना व भाजीपाला पकांना आधार द्यावा. शेतातील सर्व पकक्षेत्रातील अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी तत्काळ उपाययोजना करावी. परिसरात वादळी वारे , मेघगर्जना, वजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा असताना जर आपण शेतात असाल आ ण जवळ कुठलाच पर्यायी आसरा नसेल तर उंच जागा, उंच झाडांपासून दूर राहावे व शेवटचा पर्याय म्हणून लगेच गुडघ्यावर बसून हाताने आपले का न झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्याच्या मध्ये ठेवावे . ज मनीशी कमीत-कमी संपर्क असावा. जनावरांना पाण्याच्या स्त्रोतांपासून जसे तळे, तलाव, नदी, ई. पासून लांब ठेवावे. जनावरांना शे तामधील धातूंच्या अवजारांपासून, मोटर, सायकल व इतर वाहनांपासून दूर ठेवावे. अवकाळी पावसानंतर हवेत थंडावा निर्माण होतो, थंडीपासून फळबागांचे संरक्षणासाठी त्याच दिवशी बागेस वहिरीचे पाणी देवून हलके ओलीत करावे. अवकाळी पाऊसानंतर बागेत, शेतात, बांधावर पडलेला काडीकचरा, फळे, पाने, फांद्या वेचून बाग स्वच्छ करावी. परिसरात वादळी वारे , अवकाळी पावसानंतर शेतातील उभ्या पकाची पड झाली असल्यास पीक बांधणी करावी. परिसरात वादळी वारे , मेघगर्जना, वजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा असताना वजेवर चालणाऱ्या वस्तू इलेक्ट्रॉनिक, इलेक्ट्रिकल वस्तू आ ण यंत्रे बंद ठेवण्यात यावे . घराच्या खडक्या व दरवाजे बंद ठेवा . घरा भवतीची उंच झाडे यापासून दूर राहावे . शेतीची अवजारे , मोटर सायकल व इतर वाह नांपासून दूर राहावे . गाडी चालवत असल्यास सुर क्षत स्थळी जाण्याचा प्रयत्न करावा . मोकळ्या तसेच लटकत्या वद्युत तारांपासून दूर राहा. जंगलामध्ये दाट लहान झाडाखाली उताराच्या जागेवर निवारा घ्यावा . इतर खुल्या जागेवर , दरी सारख्या खोल जागेवर जाण्याचा प्रयत्न करावा . वीज पडल्यास त्वरित रुग्णवाहिका व वैद्यकीय मदत बोलवा , त्याला हात लावण्यास धोका नाही . मेघगर्जना व वादळ असल्यास उंच जागांवर, टेकडीवर, मोकळ्या जागांवर, स्वतंत्र एकटी झाडे, रेल्वे, बसस्थाने, दिव्यांचे खांब , धातूचे कुंपण , उघडी वाहने आ ण पाणी टाळावे . घरात असल्यास वायर द्वारे जोडले गेलेले फोन , मोबाईल व इतर इलेक्ट्रिकल उपकरणे , वद्युत जोडणी स हात लावू नये . मेघगर्जना व वादळा दरम्यान वजा चमकताना कोणत्याही वद्युत उपकरणाचा वापर करू नका . या दरम्यान आंघोळ करणे, हात धुणे, गाडी धुणे, कपडे धुणे हे कार्य करू नये . प्रवाहकीय पृष्ठभागाशी संपर्क टाळावा. धातूची तारे, खडक्यांची तावदाने, वायरिंग व नळ घराबाहेर असल्यास मेघगर्जनाच्या वेळी वजा चमकत असताना झाडाखाली कंवा झाडाजवळ उभे राहणे, वाहनांच्या , धातू कंवा वजेच्या भागाशी संपर्क टाळावा . अधांतरी लटकणार्या लोंबणाऱ्या वायर पासून लांब रहा . वजा चमकत असताना शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे . घरातील वद्युत उपकरणे बंद ठेवावी . जनावरांना सुर क्षत स्थळी ठेवावे . घराबाहेर असताना कंवा वादळी वारे वाहत असताना झाडाजवळ उभे राहू नये. सुर क्षत स्थळी आश्रय घ्यावा. |
| ऊस | पक वाढीची अवस्था | पाऊस झाल्यावर हुमणीचे भुंगेरे सुर्यास्तानंतर बाभूळ, बोर, लंब या झाडांवर पाने खाण्यासाठी गोळा होतात. अशा झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करावेत व रॉकेल म श्रत पाण्यात टाकून मारावेत. हा उपाय शेतकऱ्यांनी सामुदायिकरित्या करावा. त्यामुळे अंडी घालण्यापूर्वीच भुंगेऱ्यांचा नायनाट होईल. ऊस पकातील खोड कडीच्या जै वक नियंत्रणासाठी ट्रायकोग्रामा चलोनिस (ट्रायकोकार्ड) चार प्रती एकर तसेच कामगंध सापळे (इ.एस.बी.ल्यूर) ५ प्रती हेक्टरी वापरावेत. प्रादुर्भावग्रस्त झालेली रोपे ज मनीलगत कापावीत आ ण नष्ट करावीत. |
| कांदा | पक्वता ते काढणी अवस्था | काही ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या शेतमालाची सुर क्षत ठिकाणी साठवणूक करावी तसेच उघड्यावरील कांदा ताडपत्रीने झाकून ठेवावा. कांदा काढताना पातीसह काढून तो ३ ते ४ दिवस शेतामध्ये सुकू द्यावा. काढलेला कांदा ओळीमध्ये रचावा व अर्धवटरित्या पातीने झाकावा . पात वळल्यानंतर ४ से.मी. लांब मान ठेऊन पात कापावी. |

| | | |
|---|---|---|
| उन्हाळी भुईमूग | पक वाढीची अवस्था | भुईमूगाच्या आऱ्या ज मनीत (३५ ते ४५ दिवस) जाण्यास सुरुवात झाल्यावर आंतरमशागत करू नये. आऱ्या ज मनीत जाण्याच्या वेळी तसेच शेंगा पोसण्याच्या कालावधीत पाण्याचा ताण पडू देवू नये. |
| उन्हाळी बाजरी | पक वाढीची अवस्था | काही ठिकाणी पावसाची शक्यता असल्याने उन्हाळी बाजरी पकास ज मनीच्या मगदुरानुसार व पकाच्या वाढीच्या संवेदनक्षम अवस्थेत नुसार पाण्याचे नियोजन करावे. |
| मका | काढणी ते साठवणूक अवस्था | अमेरिकन लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५% कंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ % एस.जी. ८ ग्रॅम प्रति लटर पाणी या प्रमाणात पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. मात्र फवारणी केलेल्या मक्याचा वापर जनावरांच्या चा-यासाठी तसेच मका कणसांचा वापर खाण्यासाठी करु नये. पीक काढणी अवस्थेत आलेले असल्यास त्याची काढणी करावी. तसेच उन्हात चांगले वाळवावेत. साठवण कोंदट कवा ओलसर जागेत करू नये. |
| केळी | पीक वाढीची अवस्था | पावसाची शक्यता असल्याने उभ्या पकात पावसाचे पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी व निचऱ्याची व्यवस्था करावी. पावसाची शक्यता असल्याने झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूच्या कंवा पॉलीप्रोपेलीनच्या पाटट्यांच्या सहयायाने झाडांना/ घडाना आधार/ टेकू द्यावा. |
| आंबा | फळधारण अवस्था | मेघगर्जना, वजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा आ ण अवेळी पाऊसाची शक्यता असल्याने फळ गळ कमी करण्यासाठी झाडांना आधार द्यावा. आंबा मोहरामधील पर्णगुच्छ दिसून आल्यास तो मोहोर कापून नष्ट करावे व तोडलेल्या जागी कॉपरऑक्झीक्लोराईड द्रावण ३ ग्रॅम प्रति लटर पाण्यासोबत लावावे. तसेच आंबा पकाच्या नवीन पालवीवरील पर्णगुच्छ दिसून आल्यास ती पालवी कापून नष्ट करावी व तोडलेल्या जागी कॉपरऑक्झीक्लोराईड द्रावण ३ ग्रॅम प्रति लटर पाण्यासोबत लावावे. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | तुरळक ठिकाणी वादळी वारा , मेघगर्जना, वजासह पावसाची शक्यता असल्याने जनावरे सुरक्षीत ठिकाणी बांधावीत.<br>महात्मा फुले कृषी वद्यापीठाच्या देशी गाय संशोधन प्र शक्षण केंद्रांतर्गत पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र वभागाच्यावतीने वक सत करण्यात आलेल्या देशातल्या पहिल्या फुले अमृतकाळ ( **Phule Amrutkal App)** या पशुसल्ला मोबाईल प्रणालीचे (अॅप) लोकार्पण झाले असून , आता आपण ते मोबाईल मध्ये इंस्टाल करून मोबाईलवर पशुसल्ला घेऊ शकतो.<br>फुले अमृतकाळ अॅप डाउनलोड (**Phule Amrutkal App Download)** केल्याने होणारे फायदे : फुले अमृतकाळ या अॅप च्याद्वारे जनावरांना उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण कमी करण्यासाठी , गोठ्यातील तापमान घट वण्याकरिता व योग्य आर्द्रता राखण्याकरिता सावलीची सोय करणे , योग्य वायु वजन राखणे , पण्याकरिता थंड पाणी उपलब्ध करून देणे , फॅन कंवा फॉगर यंत्रणा स्वयंचलीत पद्धतीने सुरू करणे तसेच संतु लत आहार नियोजन इत्यादी उपाय योजना करण्यासाठी वेळोवेळी सूचना दिल्या जातील. |
| *टिप : शेतकरीबंधूनी पकावर कटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता कसान कवच बॉडीसूटचा वापर करावा. | | |

**स्त्रोत :**
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :-
ठिकाण : कृ .म.वि., पुणे.
दि. : ०१.०४.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**
**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**